# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.



Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7447744100 (PRO)



२५ जुन, २०२०


# गडचांदुर, भद्रावती आणि दुर्गापुर पोलीसांची अवैध दारूतस्करांविरूध्द कार्यवाही

दिनांक २४/०६/२०२० रोजी चंद्रपुर जिल्हयात मा. पोलीस अधीक्षक डॉ. श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात अवैध दारू तस्करांविरूध्द विशेष मोहिम राबवुन एकुण ६ लक्ष २१ हजार १०० रू चा मुद्द्माल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक २४/०६/२०२० रोजी **गडचांदुर** येथील पोलीस पथकाने पोलीस स्टेशन परिसरात मिळालेल्या गोपनीय माहितीवरून छापा टाकला असता १४४ बॉटल देशी दारू किं. २८,८००/—रू चा मुद्द्माल मिळुन आला. तसेच नाकेबंदी दरम्यान एक चारचाकी वाहनास ताब्यात घेवुन वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये ८०० बॉटल देशी दारू चा माल मिळुन आला. सदर दारूचा माल आणि वाहन असा एकुण ४,३०,०००/—रू चा मुद्द्माल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचे दोन्ही गुन्हे पोलीस स्टेशन गडचांदुर येथे नोंद करण्यात आले असुन ०३ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन भद्रावती** पोलीसांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून एक दुचाकीस ताब्यात घेवुन झडती घेतली असता, दोन इसमांच्या ताब्यात ५०० नग देशी दारू किं. ५०,०००/—रू चा माल मिळुन आला. सदर दारूचा माल आणि दुचाकी किं. ५०,०००/—रू असा एकुण १,००,०००/—रू चा मुद्द्माल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन भद्रावती येथे नोंद करण्यात आला असुन ०२ आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास सुरू आहे.

**पोलीस स्टेशन दुर्गापुर** पोलीसांनी मिळालेल्या गोपनीय माहितीवरून एका दुचाकीस ताब्यात घेवुन विचारपुस करून वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये ४३ बॉटल विदेशी दारू किं. १२,९००/—रू चा माल मिळुन आला. सदर दारूचा माल आणि दुचाकी ज्युपीटर किं. ५०,०००/—रू असा एकुण ६२,९००/—रू चा मुद्द्माल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन दुर्गापुर येथे नोंद करण्यात आला असुन ०१ आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास दुर्गापुर पोलीस करीत आहे.

---

चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
२५ जुन, २०२०
☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7447744100 (PRO)

## स्थानिक गुन्हे शाखा आणि उपविभागीय पोलीस अधिकारी गडचांदुर पथकाची अवैध दारू तस्कराविरूध्द धकाडेबाज कार्यवाही ०२ गुन्हयात ५५ लक्षचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक २५/०६/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन रामनगर परिसरात पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळली की, एक इसम मुल कडुन चंद्रपुर कडे एका चारचाकी टाटा मालवाहुन वाहनाने अवैध रित्या दारूची वाहतुक करीत आहे. अशा माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ संजय नगर चंद्रपुर रोडवर नाकेबंदी लावली असता काही वेळातच मिळालेल्या माहितीच्या वर्णनाचा एक टाटा मालवाहु ट्रक येतांना दिसला. सदर वाहनास थांबवुन विचारपुस करून वाहनाची झडती घेतली असता, वाहनातील मागच्या भागात एक विषेश कप्पा ज्यामध्ये १०० बॉक्स देशी दारू किं. १०,००,०००/—रू चा माल मिळुन आला. सदर दारूचा माल आणि वाहतुकीकरीता वापरलेले टाटा कंपनीची मालवाहु वाहन क्र. एमएच ११ एल ०५१५ किं. १०,००,०००/—रू असा एकुण २०,००,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन रामनगर येथे नोंद करण्यात आला असुन आरोपी नामे सुरज प्रकाश वावडे वय २९ रा. जुनोना चौक बाबुपेठ चंद्रपुर यास अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास रामनगर पोलीस करीत आहे.

दुसरीकडे उपविभीय पोलीस अधिकारी कार्यालय गडचांदुर आणि पोलीस स्टेशन गडचांदुर येथील पोलीस पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीवरून एका ट्रकचा पाठलाग करून नांरडा फाटा येथे ताब्यात घेवुन ट्रकची झडती घेतली असता ट्रकच्या मागच्या कप्प्यात अवैध रित्या देशी दारू १०० बॉक्स किं. ५,००,०००/—रू माल मिळुन आला. सदर दारूचा माल आणि वाहन क्र. एमएच २९ बीई २२८९ किं. ३०,००,०००/—रू असा एकुण ३५,००,०००/—रू चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन गडचांदुर येथे नोंद करण्यात आला असुन आरोपी नामे प्रकाश शालीकराव उईके उर्फ लोखंडे यास अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ. श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात **गडचांदुर** येथील कार्यवाही उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विलास यामावार यांचे नेतृत्वात पोनि. गुरूनुले, पोहवा. वसंत सिडाम, पोशि. प्रकाश निमकर, राम हाके, स्वप्निल बोंडे, यांनी केली तर **स्थानिक गुन्हे शाखेची** कार्यवाही पोलीस निरिक्षक स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपुर श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात सपोनि. जितेंद्र बोबडे, पोहवा. राजेंद्र खनके, पोना. जमीर पठाण, मिलींद चव्हाण, अनुप डांगे, प्रफुल मेश्राम, वामन ढाकणे यांनी पार पाडली.

———————————————————————————————